**महाराष्ट्र शासन**
विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्‌वाहन निरीक्षक)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,३ मजला, प्रशासकीय इमारत,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,
चेंबूर (पूर्व), मुंबई - ४०००७१.
e-mail - **eislbnlift.nrg-mh@gov.in** दूरध्वनी क्रमांक – **०२२-२५२८५९६७**

## विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री यांच्या माहे मे-२०२३ मध्ये घेण्यात येणा-या परिक्षा

विद्युत पर्यवेक्षक लेखी परिक्षा **दि.१३/०५/२०२३** रोजी व तोंडी परिक्षा **दि.१४/०५/२०२३** रोजी मुंबई/पुणे/औरंगाबाद व नागपूर या ठिकाणच्या केंद्रातुन घेण्यात येतील. तसेच तारतंत्री परिक्षा **दि.१७/०५/२०२३** पासुन मुंबई/पुणे/कोल्हापुर/औरंगाबाद/नाशिक/नागपूर व अमरावती या केंद्रातुन घेण्यात येतील. दोन्ही परिक्षेकरीता अर्ज नमुना " १२ म ", " सी " व " ई " यामध्ये तसेच दोन्ही परिक्षेच्या पुन:प्रवेशाकरीता अर्ज नमुना " १२ म " व " डी " यामध्ये सुवाच्च अक्षरात/ टंकलिखित पूर्ण भरुन संबंधित जिल्हयाचे विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांचेकडे सादर करावेत. अर्ज सादर करणे, अर्ज मंजूर/ नामंजूर यादी जाहीर करावयाचा दिनांक, त्रुटी पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक व इतर बाबी खाली दर्शविल्या प्रमाणे आहेते. मंजूर/ नामंजूर/त्रुटी अर्जाची यादी संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयात किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) खालो नमुद केलेल्या दिनांकानूसार पाहावयास मिळेल. खालील नमुद करण्यात आलेल्या परिक्षा शुल्काचा भरणा **www.cei.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर शासनाच्या **GRAS** प्रणाली व्दारे ऑनलाईन पध्दतीने भरणा करुन त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडावी. उमेदवारांनी अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेली खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

**विद्युत तारतंत्री परिक्षा**

१) महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र **(Domicile Certificate)**
२) अनुभवाचा पुरावा किंवा विद्युत कंत्राटदाराच्या हजेरीपटाची प्रत ( नुतनीकरण केलेली प्रत)
३) निवासी पुरावा ( पासपोर्ट / आधार कार्ड / वोटींग कार्ड यापैकी कोणतेही एक)
४) ३ रंगीत पासपोर्ट आकाराचे अलीकडच्या काळातील फोटो
५) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.५/- चा स्टॅम्प लावलेले २८ से.मी. x १२ से.मी आकाराचे दोन लिफाफे
६) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.४५/- चा स्टॅम्प लावलेले ४० से.मी. x २९ से.मी आकाराचा एक लिफाफा

**विद्युत पर्यवेक्षक परिक्षा**

वरील यादीतील अनुक्रमांक १ ते ६ व्यतिरिक्त खालील कागदपत्रे जोडावीत.

७) तारतंत्री परवाना व प्रमाणपत्राची छायाप्रत
८) एसएससी मार्कलिस्ट / प्रमाणपत्र
९) विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका याखेरीज इतर शाखेमध्ये पदवी / पदविका प्राप्त उमेदवारांकरीता-
  ई) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या विद्यापिठाची / मंडळाची / संस्थेची पदवी / पदविका
  ब) वरील परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर विद्युत अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील किमान एक वर्षाचा प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र
१०) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.४५/- चा स्टॅम्प लावलेले ४० से.मी. x २९ से.मी आकाराचा एक लिफाफा
११) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.५/- चा स्टॅम्प लावलेले २८ से.मी. x १२ से.मी आकाराचे दोन लिफाफे

| पर्यवेक्षक परिक्षेकरीता | | |
|---|---|---|
| अ.क्र. | विषय | दिनांक |
| १ | अर्ज वितरण | २०/०२/२०२३ पासुन |
| २ | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | १८/०४/२०२३ |
| ३ | अर्ज मंजूर/ नामंजूर/ त्रुटीची यादी मंडळ व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | २४/०४/२०२३ |
| ४ | अर्जामध्ये त्रुटी असल्यास पुर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | २८/०४/२०२३ |
| ५ | परिक्षा दिनांक ( सर्व केंद्राकरीता ) | |
| | लेखी परिक्षा **(Written)** | १३/०५/२०२३ |
| | तोंडी परिक्षा **(Oral)** | १४/०५/२०२३ |
| ६ | परिक्षा शुल्क | रु.५००/- |

| तारतंत्री परिक्षेकरीता | | |
|---|---|---|
| अ.क्र. | विषय | दिनांक |
| १ | अर्ज वितरण | २०/०२/२०२३ पासुन |
| २ | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | २४/०४/२०२३ |
| ३ | अर्ज मंजूर/नामंजूर/ त्रुटीची यादी मंडल व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | २६/०४/२०२३ |
| ४ | अर्जामध्ये त्रुटी असल्यास पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | ०३/०५/२०२३ |
| ५ | परिक्षा दिनांक(मुंबई/ पुणे/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ नाशिक/ नागपूर व अमरावती कें द्रा क री ता) | १७/०५/२०२३ पासून |
| ६ | परिक्षा शुल्क | रु.५००/- |

वर उल्लेखित करण्यात आलेल्या त्रुटीच्या पूर्तता दिनांकानंतर त्रुटी असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज मंजूर / नामंजूर करण्याचे सर्व अधिकार संबंधित अधीक्षक अभियंता किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांनी राखुन ठेवलेले आहेत. परिक्षेचे अर्ज **दि.२०/०२/२०२३** पासुन संबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. विद्युत पर्यवेक्षक परिक्षा फक्त मराठी/हिंदी/इंग्रजी या भाषांतून घेण्यात येतील. इतर तपशीलासाठी विद्युत निरीक्षक ( सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्‌वाहन निरीक्षक) मुंबई अथवा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच जिल्हयाचे संबंधित विद्युत निरीक्षक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

(उ.के.धोटे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)